आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२८ मार्च २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी नागपूरला भेट देणार
- देशी हरभऱ्याच्या आयातीवर १ एप्रिलपासून १० टक्के आयात शुल्क लावायचा सरकारचा निर्णय
- राज्यातल्या ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच पीकविमा नुकसानभरपाई जमा होणार

**आणि**

- गतवर्षाचा सरस्वती सन्मान पुरस्कार प्रसिद्ध संस्कृत विद्वान महामहोपाध्याय साधु भद्रेशदास यांना जाहीर

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला रोजी महाराष्ट्र आणि छत्तीसगढच्या दौऱ्यावर येत आहेत. नागपूरमध्ये गुढीपाडव्याच्या निमित्ताने ते स्मृतिमंदिर इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. तसंच ते दीक्षाभूमीला भेट देतील. त्यानंतर ते  माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन करतील आणि एका कार्यक्रमाला संबोधित करतील. याशिवाय इतरही प्रकल्पांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर प्रधानमंत्री छत्तीसगढला जातील. बिलासपूर इथं ३३ हजार ७०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय बंदर, जलमार्ग, आणि जहाजबांधणी मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी ‘भारतीय बंदर विधेयक २०२५’ आज लोकसभेत सादर केलं. बंदरांविषयीचे कायदे एकत्र करणं, एकात्मिक बंदरविकास योजना राबवणं, तसंच सागरकिनाऱ्याचा व्यापाराच्या दृष्टीने पुरेपूर वापर करणं या उद्देशाने हे विधेयक राज्य सागरी व्यापार मंडळांची स्थापना सर्व बंदरांचं प्रभावी व्यवस्थापन, बंदर परिसरात प्रदूषण नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा, दिशादर्शन, तंटे निवारण आणि माहिती सुविधा याविषयीच्या तरतुदी या विधेयकात आहेत. सीपीआयएमचे राधाकृष्णन आणि तृणमूल काँग्रेसचे सौगत रॉय यांनी या विधेयकाला विरोध केला.

**<><><><><>**

राज्यसभेत समाजवादी पार्टीचे रामजी लाल सुमन यांनी राणा संगा यांच्याविषयी केलेल्या विधानाबद्दल माफी मागावी अशी मागणी सत्ताधारी पक्ष सदस्यांनी केली. राष्ट्राच्या आदर्शांचा अपमान कोणीही करु नये आणि अशा थोर व्यक्तींविषयी बोलताना सदस्यांनी संवेदनशीलता बाळगावी असं अध्यक्ष जगदीप धनखड म्हणाले. इतरांच्या भावना  दुखावल्या जातील अशी टिप्पणी कोणीच करु नये असंही ते म्हणाले. अध्यक्षांनी सांगितलेल्याचं सर्वांनी पालन केलं पाहिजे असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं, आणि सपा खासदाराच्या वक्तव्याचा काँग्रेसने आणि इतर विरोधी पक्षांनी निषेध करावा अशी मागणी त्यांनी केली. देशासाठी लढणाऱ्या प्रत्येकाला आदर दिला पाहिजे, मात्र कायदा हातात घेऊन संबंधित खासदाराच्या घरावर हल्ला करणं योग्य नाही, असं विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. या मुद्यावरुन गदारोळ झाल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

एम्स रुग्णालयांमधे रुग्णांची कितीही गर्दी झाली तरी आरोग्यसेवेच्या  दर्जाबाबत तडजोड होणार नाही अस केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज लोकसभेत

सांगितलं. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ६२ कोटीपेक्षा जास्त लाभार्थ्यांना विमा कवच देण्यात आलं आहे असं त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. यात ६ कोटीपेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक असून साडेचार कोटी कुटुंबांचा समावेश आहे.

**<><><><><>**

साखरेच्या मासिक साठ्याची मर्यादा निश्चित असून या मर्यादेबाहेर साखरेचा साठा करणाऱ्या साखर कारखान्यांविरुद्ध सरकार कठोर कारवाई करेल, असा इशारा अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्रालयाने दिला आहे. साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि दरवाढ नियंत्रित करण्यासाठी एप्रिल महिन्याची साठ्याची मर्यादा २३ लाख ५० हजार टन इतकी निश्चित करण्यात आली आहे. दर महिन्यासाठी मर्यादा घालून दिलेली असतानाही काही सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी या मर्यादेचं उल्लंघन केल्याचं आढळलं आहे. त्यामुळे नवीन मार्गदर्शक तत्वं जारी करण्यात आली असून त्यात पहिल्यांदा उल्लंघन केल्यास जास्तीच्या साखरेच्या १०० टक्के भरपाई पुढच्या महिन्याच्या कोट्यातून वजा केली जाईल. त्यानंतर होणाऱ्या उल्लंघनांसाठी ही टक्केवारी वाढवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

राज्यात यंदा ९९ सहकारी आणि १०१ खासगी अशा २०० कारखान्यांनी साखर गाळप हंगाम सुरू केला होता. मात्र, गेल्या वर्षाच्या अतिपावसामुळे ऊस लागवडीवर परिणाम झाल्याने यंदा गाळपाला आलेला ऊस तुलनेने कमी आहे. राज्यात आतापर्यंत ८ कोटी १४ लाख ९२ हजार टन उसाचं गाळप झालं असून, त्यातून ७६ लाख ४३ हजार टन साखरेचं उत्पादन झालं आहे. राज्यात आतापर्यंत ९ पूर्णांक ३८ टक्के साखर उतारा मिळाला आहे.

गेल्या वर्षी याच वेळेला ९ कोटी ५४ लाख ३४ हजार टन उसाच्या गाळपातून ९५ लाख ९२ हजार टन साखरेचं उत्पादन झालं होतं. गेल्या वर्षी हवामान पोषक असल्याने राज्यात १० पूर्णांक ५ टक्के साखर उतारा मिळाला होता. राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाच्या अंदाजानुसार राज्यात यंदा सुमारे ८६ लाख टन साखर उत्पादन होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यात २४ लाख टनांची घट अपेक्षित आहे. या महिना अखेरपर्यंत राज्यातील गाळप हंगाम संपण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

**<><><><><>**

देशी हरभऱ्याच्या आयातीवर १ एप्रिलपासून १० टक्के आयात शुल्क लावायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. अर्थमंत्रालयानं २७ मार्च रोजी याबद्दलची अधिसूचना जारी केली आहे. हरभऱ्याची देशातली उपलब्धता वाढवण्यासाठी आणि किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी गेल्या वर्षी मे महिन्यात सरकारनं हरभऱ्याच्या निःशुल्क आयातीला परवानगी दिली होती. याची कालमर्यादा येत्या ३१ मार्च रोजी संपणार आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार २०२४-२५मध्ये १ कोटी १५ लाख टन देशी हरभऱ्याचे उत्पादन झाल्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

**<><><><><>**

राज्यातल्या ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच पीकविमा नुकसानभरपाई जमा होणार असल्याचं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं

आहे. शासनाने विमा कंपन्यांना द्यायचा २ हजार ८५२ कोटी रुपयांचा प्रलंबित हप्ता वितरित करण्यास मान्यता दिल्यामुळे आता लवकरच पात्र शेतकऱ्यांच्या आधारशी जोडलेल्या खात्यात पीकविमा नुकसान भरपाईची रक्कम थेट जमा होईल असं ते म्हणाले. या अंतर्गत खरीप २०२२ आणि रब्बी २०२२-२३ या हंगामांसाठी २ कोटी ८७ लाख रुपये , खरीप २०२३ साठी १८१ कोटी रुपये , रब्बी २०२३-२४ साठी ६३ कोटी १४ लाख रुपये आणि खरीप २०२४ साठी २ हजार ३०८ कोटी रुपये इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. अशा रीतीने एकूण २ हजार ५५५ कोटी रुपये रकमेचा लाभ राज्यातील ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या आपत्ती निवारण विषयक उच्च स्तरीय समितीनं राज्यासाठी ६१४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अग्निशमन सेवांचा विस्तार आणि सुधार यासाठी हा निधी आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे या समितीचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रासह एकूण ५ राज्यांना मिळून सोळाशे कोटी रुपयांहून अधिक निधी या समितीनं मंजूर केला. सिक्कीममध्ये २०२३ मध्ये आलेल्या मोठ्या पुरामुळं झालेल्या नुकसानीनंतर पुनर्वसन कार्य हाती घेण्यासाठी ५५५ कोटी रुपयांचा निधी या समितीनं मंजूर केला आहे.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यामध्ये जून ते ऑक्टोबर 2024 मध्ये सरासरी पाऊस झाला असला तरी सध्या उन्हाळा सुरू असल्याने जिल्ह्यातील दोन मध्यम प्रकल्पांमधले जलसाठे झपाट्याने कमी होत आहेत. जलसंपदा विभागाने काल जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वाशिम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी धरणात साडे

पंचवीस टक्के जलसाठा शिल्लक असून याच धरणात गेल्या वर्षी 27 मार्च 2024 रोजी 34.17 टक्के जलसाठा होता. सोनल प्रकल्पामध्ये 25 पूर्णांक 71 शतांश टक्के जलसाठा सध्याच्या घडीला शिल्लक असून गेल्या वर्षी 27 मार्च 2024 रोजी या धरणामध्ये 36 पूर्णांक 56 शतांश टक्के जलसाठा शिल्लक होता.

**<><><><><>**

पालघर जिल्हा परिषदेचा 76 कोटी 54 लाख रुपयांचा अर्थसंकल्प आज सादर झाला. यावेळी 2025-26 चा मूळ अर्थसंकल्प आणि 2024-25 चा सुधारित अर्थसंकल्प सादर करण्यात आला असून तो गेल्या वर्षीच्या तुलनेत साडेसहा टक्क्यांनी वाढला आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर नगर परिषदेने थकीत करदात्यांची यादी शहरातल्या चौकाचौकात झळकवली आहे. नगरपरिषदेने गेल्या महिन्याभरापासून थकीत करदात्यांविरोधात वसुलीची मोहीम उघडली होती. मात्र तगादा लावूनही कर भरला जात नसल्याने अखेर हा उपक्रम राबवण्यात आला आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध संस्कृत विद्वान महामहोपाध्याय साधु भद्रेशदास यांना २०२४ या वर्षाचा सरस्वती सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वामी नारायण सिद्धांत सुधा या पुस्तकासाठी त्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. मानपत्र, स्मृतीचिन्ह, १५ लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अर्जुन कुमार सिक्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं पुरस्कार विजेत्याची निवड केली आहे. नांदेडमध्ये १९६६ मध्ये जन्म झालेले भद्रेशदास हे

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संस्कृत तज्ञ आहेत. बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण पंथाची दीक्षा त्यांनी घेतली आहे.

//<><><><><><>//